# जाहीर सूचना
# जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर

## लिलाव सन 2021-2022 साठी रेतीगट /वाळुगट लिलावाकरीता ई-निविदा (e-Tendering) व ई-लिलाव (e-Auction) सूचना.

# (प्रथम लिलाव)

संदर्भ : वाळू / रेती निर्गती सुधारित धोरण, शासन निर्णय क्र. गौखनि 10/0219/प्र.क्र. 9/ख-1, दिनांक 03/09/2019 व इतर अनुषंगिक.

उपरोक्त संदर्भानुसार राज्य स्तरीय पर्यावरण प्राधिकरण यांनी पर्यावरण अनुमती दिलेल्या चंद्रपूर जिल्हयाकरीता, एकुण 28 रेतीघाटा साठी ई-निविदा व ई-लिलाव पध्दतीने लिलाव आयोजित करण्यात येत आहे. ई-निविदा व ई-लिलाव यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती / संस्था यांच्या सुलभ संदर्भासाठी https://chandrapurco.abcprocure.com व https://chanda.nic.in या वेबसाईट / संकेतस्थळावर अटी व शर्तीचा सविस्तर तपशिल उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. इच्छुक कंत्राटदार व्यक्ती / संस्था यांना सदर लिलावात सहभागी होण्यास याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

**लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी इच्छुक व्यक्ती व संस्थांनी खालील बाबींची पुर्तता करणे अनिवार्य राहील**

### (अ) ऑनलाईन रजिस्ट्रेशन / नोंदणी

1. रेती लिलाव प्रक्रियेत भाग घेणाऱ्या व्यक्ती / संस्थेस प्रथम सदर वेबसाईट / संकेतस्थळावर ऑनलाईन रजिस्ट्रेशन / नोंदणी करणे अनिवार्य राहील.
2. ऑनलाईन रजिस्ट्रेशन / नोंदणी करीता डिजीटल सिग्नेचर सर्टिफिकेट अनिवार्य राहील.
3. ई-मेल आयडी, पॅन कार्ड, TIN/GST नंबर, करारपत्र, मागील 3 वर्षाचे आयकर विवरणपत्र, विक्रीकर विवरणपत्र, रहिवास पुरावा इत्यादी अपलोड करुन रजिस्ट्रेशन करता येईल.
4. ज्या कंत्राटदारांनी यापुर्वी चंद्रपूर या जिल्हयातील सन 2020-2021 वर्षी लिलाव प्रक्रियेत संगणकीय नोंदणी (Online Registration) केलेले आहे, अशा कंत्राटदारांनी आपल्या नोंदणीचे नुतनीकरण करणे आवश्यक राहील.
5. डिजीटल सिग्नेचर प्रमाणपत्र वर्ग-2 किंवा 3 साईनिंग + एनक्रिप्शन नोंदणीवेळी संलग्न करणे आवश्यक राहील.

## (ब) ई-पेमेंट / पेमेंट

1. लिलावाच्या ई-निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्ती / संस्थाना अर्ज फी (शुल्क) व लिलावात भाग घेण्यासाठी भरावयाची इसारा रक्कम (EMD)व इतर सर्व रकमा ऑनलाईन पध्दतीने भरावी लागेल व त्यासाठी नेटबॅंकिंग / क्रेडीट कार्ड / डेबीट कार्ड / NEFT / RTGS इत्यादी बाबींचा अवलंब करावा.
2. NEFT, RTGS द्वारे देय रक्कम आपल्या बिडर आयडी मध्ये उपलब्ध करण्यासाठी किमान एक दिवस अगोदर आगाऊ भरणे / उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे.
3. ज्या वाळू गटाचे / रेती गटाचे लिलाव आयोजित करण्यात आलेले आहेत अशा पैकी ज्या वाळू गटाची हातची किंमत / अपसेट प्राईस रुपये 10.00 लक्ष पेक्षा कमी असेल तेथे रुपये 2,000/- व ती रुपये 10.00 लक्ष पेक्षा अधिक असल्यास रुपये 5,000/- एवढी रक्कम अर्ज शुल्क म्हणुन भरावी लागेल.
4. लिलावात सहभाग नोंदविणाऱ्या व्यक्ती / संस्था यांना निविदे सोबत इसारा रक्कम म्हणुन अपसेट प्राईसच्या 25% रक्कम भरावी लागेल.
5. जिल्हयाने निर्धारित केलेली प्रोसेसिंग फी (प्रत्येक जिल्हयाने येथे आपली रक्कम लिहावी) ना परतावा जमा करावी लागेल.
6. सहभाग शुल्क, निविदा दस्त प्रक्रिया शुल्क (Processing Fee) व EMD या निर्धारित प्रमाणात, निर्धारित कालावधीत व निर्धारित पध्दतीनेच भरणे अनिवार्य आहे.
7. रेती घाटाच्या प्रस्तावित पर्यावरण विषयक मंजुरीसाठीची आवश्यक पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) व Miner Closer Plan यावर येणारा खर्च लिलाव धारकास सोसावा लागेल.
8. लिलावात सर्वोच्च बोली ज्यांच्या नावें मंजुर होईल त्यांना मंजुर रकमेवर शासन निर्णयानुसार GST 18%, आयकर 2%, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी (लिलाव रकमेच्या 10%), विहित मुद्रांक शुल्क इत्यादी रकमा निर्धारित पध्दतीने भराव्या लागतील.

## (क) इतर बाबी

1. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती / संस्था यांच्याकडे नियमीत आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन कार्ड, GST Certificate, Digital Signature व विक्रीकर विभागाचा TIN क्रमांक असणे आवश्यक राहील.
2. स्वयं घोषणापत्र
   1. लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती / संस्था यांनी स्वत:स संबंध महाराष्ट्र राज्यात रेती घाट लिलावासंबंधाने काळया यादीत समाविष्ट केलेले नाही याबाबतचे स्वयं घोषणापत्र देणे बंधनकारक राहील.
   2. सदर लिलाव सूचनेच्या व्याख्येत नमुद "उत्खनन कालावधी" याची पुर्ण जाणिव असुन तद्नंतरच लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदवित असल्याबाबतचे स्वयं घोषणापत्र देणे लिलाव धारकास बंधनकारक राहील. सदरचे घोषणापत्र न दिल्यास संबंधित व्यक्ती / संस्थेस लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदविता येणार नाही.
3. ज्या रेतीघाट धारकावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे त्यांनी त्यांच्याकडे कुठलीही दंडात्मक रकमेची थकबाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.
4. सर्वोच्च बोली धारकाने सर्वोच्च बोलीच्या 25% रक्कम लिलावाच्या दिवसानंतर कार्यालयीन कामकाजाच्या 48 तासाच्या आंत जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात भरणा करणे आवश्यक आहे. उर्वरित ¾ रक्कम लिलावाच्या दिनांकापासुन 15 दिवसाचे आत भरणे आवश्यक राहील.
5. ना परतावा शुल्क : 1) ज्या वाळूगटाची हातची किंमत रु.10 लाखापेक्षा कमी आहे, त्याकरीता अर्ज शुल्क रु.2000/- व प्रक्रिया शुल्क रु. 1947/-असू एकूण 3947/- ना परतावा राहील. 2) ज्या वाळूगटाची हातची किंमत रु. 10 लाखापेक्षा जास्त आहे, त्या करीता अजर्ह शुल्क रु.5000/- अधिक प्रक्रिया शुल्क रु.1947/-

असू एकूण रु.6947/- ना परतावा राहील. तसेच निविदाधारकाने नोंदणी करीता भरणा केलेले नोंदणी शुल्क रुपये 3658/- इत्यादी ना परतावा राहील.

6. रेती घाट लिलाव सहभाग, दस्त प्रक्रिया, दस्त नोंदणी शुल्क, रेतीघाट लिलावाबाबतच्या सर्व वैधानिक प्रक्रिया, जिल्हाधिकारी यांनी निर्देशित केलेला भरणा करावयाच्या रकमा व शासनाचे देय कर याचा विहित प्रमाणात व विहित पध्दतीने भरणा करणे लिलाव धारकावर बंधनकारक राहील.
7. संदर्भाधिन शासन निर्णय, खाणकाम आराखडा मधील नमुद अटी व शर्ती, राज्यस्तरीय पर्यावरण समिती (SEIAA) यांनी दिलेले निर्देश व स्थानिक भौगोलिक स्थिती व हवामान विषयक बाबी या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने दिलेले निर्देश याचे अनुपालन करणे लिलावधारकास बंधनकारक राहील.
8. लिलाव धारक यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी ठरवलेल्या पध्दतीने व प्रस्तावित केलेल्या अटी व शर्तीच्या आधारे करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

### (ड) अपात्रता

1. वयाने अज्ञान, दिवाळखोर किंवा मतीमंद व्यक्ती किंवा केंद्र अथवा राज्य शासनामध्ये लाभाचे पद धारण केलेल्या व्यक्ती किंवा गौण खनिजाच्या स्वामीत्वधनाची थकबाकी किंवा मृत भाटकाची रक्कम (Dead Rent) थकविण्यात आली असणारी व्यक्ती/संस्था. (या प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत गौण खनिजाचे स्वामीत्वधान, मृत भाटक रक्कम, किंवा शासनाच्या महसुलाची रक्कम थकबाकीदारांची यादी वेळोवेळी तयार करण्यात येईल व प्रसिध्द करण्यात येईल.)
2. नैतिक अध:पतन केल्याबद्दल किंवा गौण खनिजाची अवैध उत्खनन किंवा वाहतुक केल्याबाबत शिक्षा झाली असेल अशी व्यक्ती
3. लगतपुर्वीच्या आर्थीक वर्षातील उलाढाल विहित मर्यादेपेक्षा कमी असल्यास- (व्यक्तीसाठी रेतीगट मुल्याच्या किमान 5 टक्के व संस्था व कंपनीसाठी रेतीगट मुल्याच्या किमान 10 टक्के एवढी उलाढाल असणे आवश्यक राहील.)
4. सदर लिलाव सूचनेत नमुद प्रक्रिया व सूचनांचे उल्लंघन करणारी सहभागी व्यक्ती / संस्था यांना अपात्र ठरविण्यात येईल.

लिलावासाठी प्रस्तावित रेतीघाट संबंधी विस्तृत माहिती जसे नमुना फॉर्म, कराराप्रत, रेतीघाट व अपसेट प्राईसची यादी, रेतीघाट लिलावाच्या अटी व शर्ती https://chandrapurco.abcprocure.com व https://chanda.nic.in या वेबसाईटवर तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, संबंधित उपविभागीय अधिकारी, संबंधित तहसिलदार यांचे कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

ई-टेंडरिंग अथवा ई-ऑक्शन मधील बोली स्विकारणे / नाकारणे तसेच कुठल्याही कारणाने तांत्रिक अडथळा निर्माण झाल्यास सदर कार्यवाही पुढे चालु ठेवणे संबंधीचा अधिकार जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी राखुन ठेवलेला आहे. इंटरनेट, सर्व्हर, विद्युत पुरवठा अथवा इतर तांत्रिक कारणाने उद्भवलेल्या अडचणीस / अडथळयास जिल्हाधिकारी कार्यालय जबाबदार राहणार नाही.

## (मराठीमध्ये)

## वाळू लिलावांकरिता बोलीदार / खरेदीदारांसाठी महत्वाची सूचना (2021-22)

- वाळू घाटाच्या विक्रीसाठी ई-निविदा व ई-लिलाव https://chandrapurco.abcprocure.com वर आयोजित केले जातील.
- डिजिटल सिग्नेचर प्रमाणपत्र वर्ग 2 किंवा 3 साइनिंग + एनक्रिप्शन नोंदणीच्या वेळी संलग्न करणे आवश्यक आहे.
- बोलीधारकांना घाट निवडणे व त्यांना खरेदी करायची घाट्सची दर भरून घ्यावी लागेल, त्यानंतर निवडलेल्या घाटांसाठी सहभाग शुल्क, निविदा दस्तऐवज फी आणि ईएमडी देण्यास सक्षम असतील.
- कृपया लक्षात घ्या की आरटीजीएस / एनईएफटी द्वारे देय रक्कम आपल्या बिडर आयडीमध्ये उपलब्ध करण्यासाठी एक दिवस अगोदर आगाऊ करणे आवश्यक आहे. म्हणूनच कृपया खात्री करा की आपण पेमेंट गेटवेवर आरटीजीएस / एनईएफटी पर्यायाद्वारे कागदपत्र शुल्क / ईएमडी देयक भरण्याआधी किमान एक दिवस अगोदर निधी पाठवायचा आहे.
- एकदा बोलीदाता अंतिम सबमिशन पूर्ण केल्यानंतर, तो इतर घाटांना जोडण्यास किंवा बोली करण्यास सक्षम असणार नाही. म्हणूनच बोलीदाराने स्वत: ला त्याच्या बिडने स्वत: ची पूर्तता करावी आणि ती फक्त ई-निविदा मध्ये "अंतिम सबमिशन" चरण पूर्ण करेल.
- **शुल्क (परत न करण्यायोग्य):** नोंदणी फी: रु. 3,658.00 (18% जीएसटी सहित) आणि निविदादाराने निवडलेल्या प्रत्येक घाटासाठी सहभाग फी: रु. 1,947.00 (18% जीएसटी सहित).
- **संपर्क तपशील:** नोंदणी प्रक्रियेशी संबंधित कोणत्याही प्रश्नासाठी, डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र सत्यापन आणि प्रथम स्तरावरील मंजूरीसाठी, कृपया खाली क्रमांक वर संपर्क साधा.

| अनुक्रमांक | व्यक्तीचे नाव | मोबाइल नंबर | ईमेल आयडी |
|---|---|---|---|
| १ | हर्ष दलवाड़ी | +916353217080 /9099090830 | harsh.dalwadi@abcprocure.com<br>info@abcprocure.com<br>himalay@abcprocure.com |

ई-निविदा आणि ई-लिलाव मध्ये बोली करताना कोणत्याही तांत्रिक समर्थनासाठी, कृपया खाली क्रमांक वर कॉल करा.

| एस्केलेशन मॅट्रिक्स | | | |
|---|---|---|---|
| नाम | मोबाइल नंबर | ईमेल आयडी | सर्व साठी सामान्य ईमेल आयडी |
| नंदल वालेरा | 9081000427 | nandan.v@eptl.in | support@abcprocure.com |
| प्रतीक पटेल | 7622000287 | pratik.patel@eptl.in | |
| फहाद खान | 9904406300 | fahad@eptl.in | |
| धरम राठोड | 9374519754 | dharam@eptl.in | |
| For e-Payment Related support, Mail to payment@eptl.in and contact to above given nos. | | | |

## (English)

## Key Instructions for bidders/ vendors/ contractors/ buyers for SAND AUCTION (2021-22)

- e-Tender & e-Auction for sale of Sand Ghats will be conducted on https://chandrapurco.abcprocure.com
- Digital Signature Certificate Class 2 OR 3 **Signing + Encryption** is mandatory to attach at the time of Registration.
- Bidders will have to select the Ghats and quote the rate first which he/she wants to purchase, then they shall be able to pay Participation Fee, Document Fee & EMD for the selected Ghats.
- Kindly note that the payment via RTGS / NEFT is required to be made one working day in advance in order to make it available in your Bidder id. Hence, please ensure that you remit funds at least one day in advance before you would like to make the document fee/EMD payment through RTGS / NEFT option on payment gateway.
- Once bidder completes the Final Submission, he/she shall not be able to add or bid for other Ghats. Hence bidder must self-satisfy himself with his bid and then and only he/she shall complete "Final Submission" step in e-Tender.
- **Charges (Non – Refundable):** Registration Fees: INR 3,658.00 (Including 18% GST) & Participation Fee for each Ghat selected by the Bidder: Rs. 1,947.00 (Including 18% GST).

**Contact Details:** For any query regarding Registration process, Digital Signature Certificate Verification and for First level approval, please contact on below nos.

| Sl. No. | Person Name | Mobile No. | Email ID |
|---|---|---|---|
| 1 | Harsh Dalwadi | +916353217080 /9099090830 | harsh.dalwadi@abcprocure.com<br>info@abcprocure.com<br>himalay@abcprocure.com |

**For any technical support while bidding in e-Tender & e-Auction, please call on below nos.**

| Escalation Matrix | | | |
|---|---|---|---|
| Name | Cell no. | Email id | Common email id for all |
| Nandan Valera | 9081000427 | nandan.v@eptl.in | support@abcprocure.com |
| Pratik Patel | 7622000287 | pratik.patel@eptl.in | |
| Fahad Khan | 9904406300 | fahad@eptl.in | |
| Dharam Rathod | 9374519754 | dharam@eptl.in | |
| For e-Payment Related support, Mail to payment@eptl.in and contact to above given nos. | | | |

# रेतीघाट यादी

| अ.क्र. | तालुका | रेतीघाटाचेनाव | नदीचे नाव | नदीघाटा लगनचे गट नंबर | लांबीx रुंदीxखोली (मिटर मध्ये) | आराजी (हे.आर.) | ब्रास | हातची किंमत रुपये | (EMD 25%) इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वरोरा | बोरी | वर्धा नदी | 185,186,187,188,189 | 700X80X1.00 | 5.60 | 19788 | 21186300 | 5296575 |
| 2 | वरोरा | सोईट | वर्धा नदी | Soit: 454,34,35,23/1 Dindoda: 139,140 | 700X80X0.50 | 5.60 | 9894 | 10593200 | 2648300 |
| 3 | भद्रावती | पिपरी दे. | वर्धा नदी | 45,46,47,48/2,49,50,52,53,54, 55,56,57,231,234,233,235, 247,248,249/2 | 960X75X0.50 | 7.20 | 12721 | 13619900 | 3404975 |
| 4 | भद्रावती | पारोधी | इराई नदी | 118,119,120,128,129,130,131, 154,156,157,158,159,155 | 1150X50X0.50 | 5.75 | 10159 | 10876900 | 2719225 |
| 5 | भद्रावती | जेना निवली-काशी | जेना निवली नाला | 117 to 53,245/2 to 252/1 | 980X52X0.50 | 5.09 | 9004 | 9640300 | 2410075 |
| 6 | गोंडपीपरी | चकलिखीलवाडा | अंधारी नदी | 178,179,180 | 750X70X1.00 | 5.25 | 18551 | 19861900 | 4965475 |
| 7 | गोंडपीपरी | चक सोमनपल्ली | चक सोमनपल्ली नाला | 105,104,103,102,101 | 809X65X0.50 | 5.25 | 9291 | 9947600 | 2486900 |
| 8 | पोंभुर्णा | चक वेळवा | अंधारी नदी | 56,57,58,61,63,67 | 900X60X0.50 | 5.40 | 9541 | 10215200 | 2553800 |
| 9 | पोंभुर्णा | घाटकूल | अंधारी नदी | 372,373,371,360,369,359,358 | 950X60X0.50 | 5.70 | 10071 | 10782700 | 2695675 |
| 10 | पोंभुर्णा | जाम खुर्द | अंधारी नदी | 110 | 400x100x0.50 | 4.00 | 7067 | 7566400 | 1891600 |
| 11 | पोंभुर्णा | आष्टा | अंधारी नदी | 329, 331 | 300x50x0.70 | 1.50 | 3710 | 3972200 | 993050 |
| 12 | पोंभुर्णा | चक बल्लारपूर-1 | अंधारी नदी | 26 | 250x50x0.50 | 1.25 | 2208 | 2364100 | 591025 |
| 13 | पोंभुर्णा | चकबल्लारपूर-2 | अंधारी नदी | 314 | 260x40x0.50 | 1.04 | 1837 | 1966900 | 491725 |
| 14 | ब्रम्हपूरी | कोलारी | वैनगंगा नदी | 75,78,79,80 | 500X100X1.00 | 5.00 | 17668 | 18916500 | 4729125 |
| 15 | ब्रम्हपूरी | बेलगांव | वैनगंगा नदी | 287/1,287/2,292,293,294,295, 297,298,17 | 500X120X1.00 | 6.00 | 21201 | 22699100 | 5674775 |
| 16 | ब्रम्हपूरी | अन्हेरनवरगांव चिखलधोकडा | वैनगंगा नदी | 811,812,813,814,818,819,820 | 520X100X0.50 | 5.20 | 9187 | 9836200 | 2459050 |
| 17 | ब्रम्हपूरी | अन्हेरनवरगांव आवळी | वैनगंगा नदी | 833,1050,1051/1,1051/2, 1051/3,1052,1053,1054 | 550X100X0.50 | 5.50 | 9717 | 10404000 | 2601000 |
| 18 | ब्रम्हपूरी | पिंपळगांव | वैनगंगा नदी | 257,258,259,260,261,262,263, 264,265,266,320,321,322,325 | 850X60X0.50 | 5.10 | 9011 | 9647800 | 2411950 |
| 19 | ब्रम्हपूरी | हळदा | वैनगंगा नदी | 914,915,933,934,935,936,937,938, 950,951,952,953,954,958,959 | 1000X100X1.00 | 10.00 | 35336 | 37832900 | 9458225 |
| 20 | सावली | साखरी | वैनगंगा नदी | 173,174,176,177,178/3,179, 180,181,182,184,185,186,242, 172,171,111,110 | 1250X120X1.00 | 15.00 | 53004 | 56749300 | 14187325 |
| 21 | सावली | लोंढोली | वैनगंगा नदी | 624,463,625,627,634,635,640, 641,642,645,646,647 | 600X90X1.50 | 5.40 | 28622 | 30644500 | 7661125 |
| 22 | सावली | बोरमाळा | वैनगंगा नदी | 70,68,69,67,66,65,64,63,62,61, 59,58,57,701,700,699,698,708, 697,696,694,695 | 1350X120X1.00 | 16.20 | 57244 | 61288900 | 15322225 |
| 23 | मूल | कोसंबी | उमा नदी | 240,242,243,244,245,425,426 | 500X100X1.00 | 5.00 | 17668 | 18916500 | 4729125 |
| 24 | मूल | भादुर्णी | उमा नदी | 51,59,58,236,260,261 | 500X100X1.00 | 5.00 | 17668 | 18916500 | 4729125 |
| 25 | मूल | हळदी-गावगण्णा | उमा नदी | 61,62,63,65,70,71,184,185, 186, 194 | 450x60x0.50 | 2.70 | 4770 | 5107100 | 1276775 |
| 26 | मूल | डोंगरगांव | उमा नदी | 442,421,409,405,404,403,401, 400 | 800x50x0.50 | 4.00 | 7067 | 7566400 | 1891600 |
| 27 | सिंदेवाही | वासेरा | उमा नदी | Wasera: 223,225,230,232 Shivni: 597,598,601,604,600 Umbrai: 191,182,181,189,178,180 | 900X60X0.50 | 5.40 | 9541 | 10215200 | 2553800 |
| 28 | सिंदेवाही | लालचिचबोडी | उमा नदी | 74,75,76,77,80 | 1000X50X0.50 | 5.00 | 8834 | 9458300 | 2364575 |

# एक वर्षासाठी आयोजित ई-लिलावातील महत्वाच्या व्याख्या
## (2021-2022)

| | | |
|---|---|---|
| 1 | **लिलाव कालावधी** | 30 सप्टेंबर,2022 |
| 2 | **लिलाव वर्ष** | सन 2021-2022 |
| 3 | **अपसेट प्राईस / हातची किंमत** | एका लिलाव वर्षासाठी ठरविण्यात आलेली अपसेट प्राईस / हातची किंमत असा त्याचा अर्थ आहे. |
| 4 | **लिलाव रक्कम** | ज्या बोलीवर लिलाव मंजूर करण्यात आला ती सर्वोच्च बोली. ही रक्कम लिलावधारकास लिलाव मंजूर झाल्यास 30 दिवसात भरावी लागेल. |
| 5 | **रेती उत्खनन कालावधी** | लिलाव कालावधी दरम्यान ज्या कालावधीत लिलावधारकास प्रत्यक्ष उत्खनन करता येईल असा कालावधी म्हणजे "उत्खनन कालावधी" राहील, परंतु हा कालावधी त्या लिलाव वर्षाच्या 10 जुन रोजी संपुष्टात येईल. लिलावाची संपुर्ण रक्कम भरुन करारनामा स्वाक्षरीत झाल्यानंतर मोजणी करुन प्रत्यक्ष ताबा दिल्यापासून 10 जून 2022 पर्यंत उत्खनन कालावधी राहील.<br>**सदरची परवानगी निर्गमित दिनांकापासून त्या वर्षाच्या 10 जून पर्यंतच वैध असेल. त्यामुळे 10 जून नंतर कुठल्याही परिस्थीतीत उत्खनन करता येणार नाही याची सर्व लिलाव धारकांनी नोंद घ्यावी.**<br>**लिलावधारक यांनी उपरोक्त उत्खनन कालावधी बाबतच्या तरतुदी समजून घेऊन निवीदा भरावी व उत्खनन कालावधी बाबत नोंद घेतली असून सदर बाब समजली असल्याबाबत स्वयंघोषणापत्र सादर करावे. कुठल्याही परिस्थितीत उत्खनन कालावधी वाढवून देण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही यांची लिलाव धारकांनी नोंद घ्यावी.**<br>लिलाव घेण्याची तारीख काहीही असेल तरीही लिलाव वर्ष त्या-त्या लिलाव वर्ष 30 सप्टेंबर रोजी तर, त्या त्या लिलाव वर्षातील उत्खनन कालावधी हा 10 जून रोजी संपुष्टात येईल. |
| 6 | **उत्खनन केव्हा करता येईल** | उत्खनन योग्य रेती साठा संपेपर्यंत वा उत्खनन कालावधी संपेपर्यंत या पैकी जे अगोदर येईल तोपर्यंतच उत्खनन करता येईल. उत्खनन योग्य साठा उपलब्ध असला तरीही उत्खनन कालावधी संपल्यानंतर त्याचे उत्खनन करता येणार नाही व उत्खनन कालावधी शिल्लक असला तरीही उत्खनन योग्य साठा संपल्यानंतर उत्खनन करता येणार नाही. |
| 7 | साठा केव्हा करता येईल | उत्खननाची परवानगी निर्गमित दिनांकापासून साठा करता येईल. उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक,लिलाव ज्या अपर जिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी यांनी केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासहआवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलावधारकाची असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळु/रेती चे उत्खनन केलेला आहे त्या वाळूचा /रेतीचा साठा मुदत त्या वर्षीच्या 30 सप्टेंबर,2022 पर्यंतच वैध असेल. मूदत संपल्यानंतीर 10 दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही. तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा वाळूच्या/रेतीच्या किंमतीबाबत अथवा |

मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.

तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतरच्या 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेतीसाठा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतूकीसाठी दुय्यम वाहतूका पासेस देण्यात येणार नाहीत.

(विद्युत वरखेडकर)
अपर जिल्हाधिकारी,चंद्रपूर

**<u>लिलावाचे वेळापत्रक</u>**

| | |
|---|---|
| दिनांक 05/01/2022 | रजिस्ट्रेशन ऑनलाईन (संगणकीय नोंदणी) पध्दतीने सुरु होईल. |
| दिनांक 06/01/2022 | इच्छुक रेतीघाटा निविदा/बोलीधारकांकरिता प्रशिक्षण वेळ दुपारी 1.00 वाजता (स्थळ:- वीस कलमी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर |
| दिनांक 11/01/2022 | सायंकाळी 06.00 वाजता ऑनलाईन रजिस्ट्रेशन (संगणकीय नोंदणी) पध्दत बंद होईल. |
| दिनांक 12/01/2022 | सकाळी 10.00 वाजता पासुन ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने (संगणकीय नोंदणी) जमा करणे सुरु होईल. |
| दिनांक 18/01/2022 | सायंकाळी 6.00 वाजता ई-निविदा (ई-टेंडर) (संगणकीय) ऑनलाईन स्वीकारणे बंद होईल. |
| दिनांक 19/01/2022 | ई-ऑक्शन (ई-लिलाव) प्रक्रिया सकाळी 10.00 वाजतापासून सायंकाळी 5.00 वाजेपर्यत सुरु राहील. त्यानंतर लिलाव बोली उघडण्यात येतील व लगेच ई-टेंडर /ई-निविदा) उघडण्यात येतील. |

(विद्युत वरखेडकर)
अपर जिल्हाधिकारी,चंद्रपूर